# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ५९ वा शुक्रवार दि.०२ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN

Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


# विधानसभा निवडणुकीनंतर ओबीसी आरक्षणला धोका प्रकाश आंबेडकरांना वाटतेय भीती; जरांगेंच्या मागण्यांनाही केला विरोध

बीड : येत्या विधानसभा निवडणुकीनंतर ओबीसी आरक्षण धोक्यात येणार असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी केला आहे. दरम्यान मविआच्या नेत्यांनी आरक्षणासंदर्भातील भूमिका मांडलीय त्यावरही प्रकाश आंबेडकरांनी संशय व्यक्त केला आहे. ५५ लाख कुणबी प्रमाणपत्र वाटप आणि सगे सोयरेच्या अंमलबजावणीला विरोध असल्याचं प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केलंय. ते बीडमध्ये बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, शरद पवारांसारख्या व्यक्तिमत्त्वाने विधानसभेत आम्ही २२५ आम्ही आमदार आणणार असे म्हटले आहे. लोकसभेचे त्यांचं आणि महाविकास आघाडीचे वागणं बघितल्यानंतर ते मराठा समाजाशिवाय दुसरं कोणालाच आणणार नाहीत अशी परिस्थिती आहे. त्याच्यामुळे ओबीसीची जी मागणी जातनियाहाय जनगणनेची तीच पद्धत वापरण्यात येईल. विधानसभेमध्ये दुसरा ठराव मंजूर केला जाईल की जनगणनेची आकडेवारी आल्यानंतर आपण याची अंमलबजावणी करतो तोपर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे. एकदा विधानसभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये असं ठराव मंजूर झाला की मग आपल्याला कोर्टात जाता येत नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा तो मार्ग विधानसभेनंतर अवलंबतील. यासंदर्भात त्यांच्या बैठका देखील झाल्याची माहिती आहे. हा ठराव होऊ द्यायचा नसेल तर ओबीसी समाजाचे किमान १०० आमदार विधानसभेत पाठवावे.

महाविकास आघाडी आरक्षणासंदर्भात भूमिका घ्यायची टाळत आहे : प्रकाश आंबेडकर

महाविकास आघाडीमधील काँग्रेस,राष्ट्रवादी शिवसेना यांची मराठा आरक्षणासंदर्भात भूमिका घ्यायची टाळत आहेत. शिवसेना केंद्राकडे बोट दाखवते, राष्ट्रवादी मणिपूर दाखवते आणि काँग्रेस वेट अँड वॉच भूमिका घेत आहे. मराठा आरक्षणासंदर्भात महाविकास आघाडी लोकसभेसारखीच संदिग्ध भूमिका घेईल आणि त्यातून राजकीय हित फायदा करून घेईल, असे देखील प्रकाश आंबेडकर म्हणाले.

मराठा आरक्षणाला पाठिंबा, मात्र दोघांची ताट वेगळी पाहिजे : प्रकाश आंबेडकर

मराठा आरक्षणाला माझा आजही पाठिंबा आहे. ओबीसीचं ताट वेगळं असलं पाहिजे आणि मराठा समाजासाठी वेगळं ताट असले पाहिजे. ५५ लाख दिलेले सर्टिफिकेट हे चुकीचे आहेत आणि सगळे सोयऱ्यांची संकल्पना देखील चुकीची आहे या दोन्ही गोष्टींचा विरोध आहे, असे आंबेडकर म्हणाले.



विधनसभेला जरांगे पाटलांनी २८८ जागा लढवाव्यात: प्रकाश आंबेडकर

जरांगे पाटील श्रीमंताचे पुढारी नाहीत. लोकसभेत गरीब मराठ्यांना संधी दिली नाही. त्यामुळे विधानसभेत जरांगे पाटील यांनी २८८ जागा लढवाव्यात. मात्र मराठ्यांचे कुणबी प्रमाणपत्र आणि सगे सोयरे याला माझा विरोधच प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केली आहे.

# अण्णा भाऊ साठे यांना भारत सरकारने भारतरत्न पुरस्कार दयावा –माजी मंत्री आमदार अमित देशमुख

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रा. शिवाजीराव जवळगेकर यांना समाजभूषण पुरस्कार देण्यात आला. यावेळी आमदार देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



लातूर प्रतिनिधी : १ ऑग्ष्ट २०२४ : अण्णाभाऊ साठे यांचे कार्य मोठे आहे त्यांचा नावलौकीक जगभर आहे, भारत सरकारने त्यांना भारतरत्न पुरस्कार दयावा अशी मागणी लातूर येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमीत्ताने आयोजीत कार्यक्रम प्रसंगी माजी मंत्री आणि आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बोलतांना करुन लातूर शहरातील अण्णा भाऊ साठे स्मारक हे लोकनेते विलासराव देशमुख आणि सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आले आहे, मराठवाड्यात असे दुसरे स्मारक नाही असे आर्वजून त्यांनी सांगीतले. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी लातूर शहरातील साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. प्रारंभी आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर २०२४ चे अध्यक्ष राज क्षीरसागर, मोहन सुरवसे, गोरोबा लोखंडे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष किरण जाधव, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष संजय शेटे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, चंद्रकांत चिकटे, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, गणेश एस.आर. देशमुख, जीवन सुरवसे, संभाजी मस्के, वर्षा मस्के केशरबाई महापुरे, मनीषा पुंड, सचिन कांबळे, विश्वजीत गव्हाणे, पिराजी साठे, आनंद वैरागे, जेष्ठ पत्रकार अशोक देडे, नाना कांबळे, मंगेश वैरागे, सुनील बसपुरे, सुभाष घोडके, इम्रान सय्यद, रमेश सूर्यवंशी, अयोध्याबाई उपाध्याय, नारायण कांबळे, राजु मगर, अंगद गायकवाड, जी.ए गायकवाड, सिताराम पवार, सचिद्र कांबळे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूरचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी पूढे बोलतांना म्हणाले की, लातूरच्या परंपरेनुसार आपण साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी करत आहोत. सार्वजनीक जीवनात अण्णा भाऊच्या विचारांचा वारसा आपण जोपसतो तो विचाराचा वारसा आपण सारेच पुढे घेऊन जात आहोत, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक लातूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी सर्वांच्या परिश्रमातून लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नातून व सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या योगदानातून उभे राहिले आहे. मराठवाड्यात असे स्मारक शोधूनही सापडणार नाही असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा अशी मागणी केली आहे. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचा नावलौकिक जगभर आहे भारत सरकारने त्यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा असे सांगून त्यांनी सर्वांना साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ कार्यान्वित

## नारीशक्ती दूत पवर भरलेले अर्ज पुन्हा संकेतस्थळावर भरण्याची गरज नाही




लातूर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत ऑनलाइन अर्ज दाखल करण्यासाठी नवीन वेबसाईट (संकेतस्थळ) सुरू करण्यात आले आहे. नारीशक्ती दूत पवर अर्ज भरलेल्या महिलांनी या संकेतस्थळावर अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्यांनी अद्याप अर्ज सादर केलेले नाहीत, अशा पात्र महिलांनी या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख यांनी केले आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी आतापर्यंत तीन लाखापेक्षा अधिक महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. उर्वरित महिलांचे अर्ज भरुन घेण्याची




कार्यवाही प्राधान्याने सुरु आहे. या योजनेतील महिलांना अर्ज भरण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या अडचणी येवू नयेत, यासाठी शासनाच्यावतीने हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे. तरी या योजनेसाठी पात्र महिलांनी अर्ज भरण्यासाठी या संकेतस्थळाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. शेख यांनी केले आहे.

# साहित्यसम्राट स्व. अण्णाभाऊ साठे यांना शासनाने भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मान करावा– आ. कराड

## मळवटी येथे समाज मंदिराचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भूमिपूजन

लातूर : – थोर महापुरुषांच्या नावाने आपल्या भारत देशाची जगात ओळख असून महापुरुषांच्या त्यागातून बलिदानातून, शिकवणीतून आणि विचारातून देश, समाज प्रगती करत आहे. लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत साहित्याची निर्मिती केली त्या साहित्यातून समाज परिवर्तन केले अशा या थोर अण्णाभाऊ साठे यांचा शासनाने भारतरत्न पुरस्कार देऊन मान सन्मान करावा यासाठी आपण मा. मुख्यमंत्री, मा. पंतप्रधान साहेब यांच्याकडे पाठपुरावा करू असे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती निमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे मळवटी येथे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते अण्णाभाऊ साठे समाज मंदिर बांधकामाचे भूमिपूजन, जयंती उत्सवाचे ध्वजारोहण, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि ज्येष्ठ नागरिकांचा व मान्यवरांचा फकीरा कादंबरी देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गोविंद गरड हे होते. याप्रसंगी प्रसिद्ध कवी संजीवकुमार भोसले, ॲड सिद्धार्थ सोनवणे, गोविंद नरहरे, उपसरपंच श्रीकांत बैले, उमेश बेद्रे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, लक्ष्मण नागिने सचिन साबदे, मारुती शिंदे, डॉ. अभय कदम, राजपाल जाधव, सुधाकर शिंदे, महेश वाघमारे, जगद्गुरु संत तुकोबाराय साहित्य परिषदेचे ब्रिजलाल कदम यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

मळवटी येथील जयंती उत्सव समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजश्री शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी यासह अनेक थोर





महापुरुष या देशात जन्माला आले नसते तर देश आणि समाज कुठे गेला असता असा प्रश्न उपस्थित करून केवळ महापुरुषांच्या विचाराने देशाची प्रगती होत आहे, समाज पुढे जात आहे. देशाची वैभव जगात दिसत आहे. थोर पुरुषाच्या विचाराचे आचरण प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे असेही आव्हान यावेळी त्यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत विविध विकास कामासाठी आमदार निधी बरोबरच शासनाच्या विविध योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला अनेक मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधी मिळवून दिला असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने आणि राज्यातील महायुती शासनाने प्रत्येक घटकांना न्याय देण्याची भूमिका घेऊन शेतकरी सन्मान योजना, मोफत राशन, मुख्यमंत्री लाडकी बहीण, एक रुपयात पिक विमा, घरकुल, शुद्ध पाणीपुरवठा योजना, महिलांना प्रवासात सवलत, यासह विविध योजना सुरू केल्या असल्याची माहिती दिली. या सर्व योजना राबवताना कुठेही दलाल राहणार नाही याची काळजी घेऊन लाभार्थ्यांना योजनेचा थेट लाभ मिळत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले.

यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. मळवटी येथील ग्रामस्थांनी वाजत गाजत आ. कराड यांचे जोरदार स्वागत केले. या कार्यक्रमास मळवटी आणि परिसरातील तुकाराम कलवले, गणपत शिंदे, अंगद येचवाड, लिंबराज बोळंगे, गणेश दुपटे, विनोद शिंदे, देवानंद गायकवाड, शरद शिंदे, किशोर पाटील, अहमद शेख यांच्यासह समाज बांधव गावातील नागरिक भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून विनम्र अभिवादन



लातूर :– स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच.अशी घोषणा देणारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रगण्य नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि आपल्या साहित्यातून समाजाला दिशा देणारे साहिद्धत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी या दोन्ही थोर महापुरुषांना पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात महान स्वातंत्र्यसेनानी, उत्कृष्ट वक्ते, उत्तम समाजसुधारक, पत्रकार, लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि आपल्या लेखणीतून कष्टकरी, उपेक्षित वर्गाच्या वेदना जगासमोर मांडणारे साहिद्धत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती भाजपा नेते आ रमेशआप्पा कराड यांनी पुष्पांजली अर्पण करून साजरी करण्यात आली यावेळी भाजपाचे गोविंद नरहरे, उमेश बेद्रे, सुरज शिंदे, अमर चव्हाण यांच्यासह अनेक जण होते.

## संपादकीय....

# आसियान शिखर परिषदेचा संदेश

लाओसची राजधानी व्हिएनटाईन येथे नुकतीच आसियान परराष्ट्रमंत्र्यांची ३१ वी परिषद झाली. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी यावेळी भारत आसियानमधील दृढ संबंधांचे महत्त्व विषद करतानाच चीन समुद्र क्षेत्रात सर्व शेजारील राष्ट्रांनी आचारसंहिता पालनावर भर दिला आहे. यंदाच्या शिखर परिषदेने सदस्य राष्ट्रांना भेडसावणार्या अनेक प्रश्नांवर विचारविनिमय केला. त्यामध्ये हवामान बदल, म्यानमार संकट, कोरोना महामारीनंतरच्या समस्या तसेच मुक्त व्यापार, आर्थिक समस्या आदींवर चर्चा झाली. व्हिएनटाईन येथील परिषदेत भारताचे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी सहअध्यक्ष या नात्याने मांडलेली भूमिका दिशादर्शक ठरणारी आहे. आसियानच्या माध्यमातून भारताने पूर्व आशियातील देशांशी संबंधांच्या विकासाचा मार्ग खुला केला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणातील नव्या गतीतत्त्वांच्या आधारे जी-२० शिखर परिषदेत जी हमी दिली होती त्याच अनुषंगाने धोरणात्मक कृती करण्यासाठी या व्यासपीठाचा खूप चांगला उपयोग झाला आहे. दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना म्हणजे आसियान ही राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक मंच म्हणून काम करते. या संघटनेतील सदस्य देशांचे एकूण क्षेत्रफळ ४.५ दशलक्ष किलोमीटर आहे आणि ६०० दशलक्षपेक्षा अधिक लोकसंख्येचे ही संघटना प्रतिनिधित्व करते. त्यांच्या आर्थिक विकासाचा सरासरी दर ६.५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या संघटनेचे ब-ीद 'एक दृष्टी, एक ओळख, एक समुदाय' असे आहे. या संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय इंडोनेशियाची राजधानी जाकार्ता येथे आहे. जगातील प्रभावी व शक्तिशाली संघटन म्हणून आसियानला महत्त्व असून इंडोनेशियासारख्या वर्धिष्णू अर्थव्यवस्थेचा त्यात समावेश आहे. आसियानच्या परराष्ट्रमंत्र्यांची यंदाची बैठक आणि त्यातील प्राधान्यक्रमाचे विषय हे राजकीय आणि आर्थिकदृष्टीने महत्त्वाचे आहेत. पूर्व आशियात शांतता, स्थैर्य आणि सत्तेचे संतुलन राखण्यासाठी प्रयत्न करणे आणि हिंद-प्रशांत क्षेत्रातील सुरक्षेवर भर देण्यासाठी सामुदायिक व्यूहरचना करणे हे या बैठकीचे उद्दिष्ट होते. भारताने ॲक्ट ईस्ट पॉलिसीच्या दृष्टीने जी पावले टाकली आहेत ती मजबूत करण्याचा प्रयत्न या शिखर परिषदेत केला आहे. पूर्व आशियातील १८ देशांचे परराष्ट्रमंत्री या परिषदेस उपस्थित होते. हिंद-प्रशांत क्षेत्रातील सुरक्षेच्या दृष्टीने भारतासाठी 'आसियान'ला विशेष महत्त्व आहे. कृषी, आर्थिक विकास, सुरक्षा यादृष्टीने या परिषदेतील विचारमंथन दिशादर्शक ठरले आहे. परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी आसियानमधील बैठकीपूर्वी पूर्वी थायलंड आणि मलेशिया या महत्त्वाच्या देशांना भेटी दिल्या आणि तेथील संबंधांची व्यूहरचना केली. हिंद-प्रशांत क्षेत्रातील चीनच्या हालचालींना प्रतिशह देण्यासाठी आसियान गटाला व्यूहरचनात्मकदृष्टीने महत्त्व आहे. त्यामुळेच मागील वर्षी जाकार्ता येथे झालेल्या या गटाच्या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी जाहीर केलेल्या १२ कलमी आराखड्याच्या आधारे भारताने अंमलबजावणी सुरू केली आहे. भारत आणि आसियान गटातील देशांचे निरोगी संबंध हे समान हिताच्या मुद्द्यावर आधारलेले आहेत. भविष्यकाळात हे अधिक वाढत जाणार आहे. व्हिएनटाईन शिखर परिषदेत जयशंकर यांनी भाषणामध्ये भारताचे राजकीय, आर्थिक व सुरक्षाविषयक प्राधान्यक्रम आणि पूर्वेकडे कृती करा या धोरणाचा भाग म्हणून भारताने केलेल्या व्यूहरचनेबद्दल यथायोग्य माहिती दिली. त्यांनी असे सूत्र मांडले की, जी-२० परिषदेत भारताने एक १२ कलमी योजना घोषित केली होती आणि आसियानच्या दृष्टीने या योजनेला महत्त्व होते. व्हिएनटाईनमधील बैठकीत आसियानसमोरील प्रश्नांचा आणि आव्हानांचा विचार केला. तसेच राजकीय, आर्थिक व सुरक्षाविषयक कृती कार्यक्रमाला अंतिम रूप दिले. भविष्यकाळात पूर्व व आग्नेय आशियातील देशांना एकत्र करून त्यांना हिंद-प्रशांत क्षेत्रात अधिक भक्कम विकासाच्या संधी प्राप्त करून देण्याचे आसियान हे एक व्यासपीठ आहे. चीनच्या वाढत्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे आणि सत्ता समतोलाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडणे हेही आसियानचे एक महत्त्वाचे लक्ष्य आहे. जयशंकर यांनी दक्षिण चीन समुद्र क्षेत्रात सर्व शेजारील राष्ट्रांनी आचारसंहिता पालनावर भर दिला आहे. व्हिएनटाईन शिखर परिषदेने सदस्य राष्ट्रांना भेडसावणार्या अनेक प्रश्नांवर विचारविनिमय केला. त्यामध्ये हवामान बदल, म्यानमार संकट, कोरोना महामारीनंतरच्या समस्या तसेच मुक्त व्यापार, आर्थिक समस्या इत्यादींवरही चर्चा झाली. आर्थिक विकासाचा रोडमॅप तयार केला. अर्थव्यवस्थांना नवचैतन्य देणे, अन्नसुरक्षा वाढविणे, पर्यावरण संतुलन राखणे, ऊर्जा समस्या सोडविणे, शैक्षणिक व सांस्कृतिक आदानप्रदान, क्रीडा व पारपंरिक कलांना उत्तेजन देणे या क्षेत्रातही आसियान भरीव कार्य करीत आहे.

# साबणाचा पुनर्जन्म.

हॉटेल रूम मध्ये चेक इन केल्यानंतर, बॅग्ज ठेवून आपण सहसा पहिल्यांदा वॉशरूम कडे वळतो.बाथरूम काउंटर पाशी ठेवलेला आकर्षक पॅकिंग मधला साबण वापरतो. प्रत्येक हॉटेल अतिशय चोखंदळपणे साबण,शॅम्पू,त्यांचे पॅकिंग,त्यावरील ब्रॅण्डिंग याकडे लक्ष देऊन निवडत असते.पण हे छोटे आकर्षक साबण पुढे जाऊन त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरते.१-२ दिवस वापरून ग्राहक साबण तसाच ठेवतात (काही ग्राहक घरी नेतातही !) आणि त्या उरलेल्या साबणाची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी हॉटेल्स कडे येऊन पडते. तुम्ही म्हणाल एका छोट्याश्या साबणाला इतकं काय महत्व द्यायचं ? पण मित्रांनो तसं नाही.हा खरंतर जगभरात एक मोठा प्रॉब्लेम आहे. उदाहरणार्थ भारतातच बघा.भारतात साधारण ५०,००० हॉटेल्स असतील असं गृहीत धरूया (प्रत्यक्षात जास्तच असतील),प्रत्येक हॉटेल मध्ये सरासरी १० रूम्स धरल्या तर एकूण ५ लाख रूम्स आहेत.७०% ने साधारण ३.५ लाख रूम्स दररोज वापरल्या जातात.म्हणजेच दररोज ३.५ लाख साबण थोडेसे वापरून फेकून दिले जात आहेत.'या साबणांचं काय करायचं ?'.असा प्रश्न खचितच हॉटेल मधील कुणा गेस्टला पडला असेल ! पण १४ वर्षांपूर्वी अमेरिकेत एका माणसाला हा प्रश्न पडला.नुसत्या प्रश्नावर तो थांबला नाही तर त्याचं उत्तरही त्याने शोधलं आणि त्या दिवसापासून आजपर्यंत त्याच्या उत्तराने जगभरातील हजारो लोकांचे प्राण वाचवले !.त्याने साबणाला पुनर्जन्म दिला आणि अनेकांना मृत्यूपासून वाचवलं...त्याची ही गोष्ट.अमेरिकेतील शॉन सिपलर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करत होता.शॉन ला कामानिमित्त जगभर फिरावं लागत असे. इतकं की वर्षातील १५०-२०० दिवस तो हॉटेल्स मध्येच राहत असे.

२००८ साली अशाच एका हॉटेल मध्ये शॉन थांबला होता तेव्हा त्याला अर्धवट वापरलेल्या साबणाचं पुढे काय होतं हा प्रश्न पडला.त्याने लागलीच रूम सर्विसला फोन केला आणि वापरलेल्या साबणांचं तुम्ही काय करता ? हा प्रश्न विचारला. उत्तर आलं, आम्ही वापरलेले साबण फेकून देतो. शॉन ने थोडी आकडेमोड केली आणि त्याला लक्षात आलं की लाखो साबण दररोज फेकले जात आहेत.यावर आपण काहीतरी करायला हवं. तो विचार त्याच्या डोक्यात घर करून बसला.काही आठवड्यानंतर तो जेव्हा घरी परतला तेव्हा जवळच असलेल्या केश्रळवरू खपप हॉटेल मध्ये जाऊन त्याने हाच प्रश्न विचारला.उत्तर ही तेच मिळालं.त्याने मॅनेजरला विचारलं टाकून देण्याऐवजी तुम्ही हे साबण मला द्याल का ? मॅनेजर ने होकार दिला.त्याच दिवशी त्याने सहा आणखी हॉटेल्सना भेट दिली आणि सगळ्या हॉटेल्सने होकारच दिला.

एका महिन्यातच शॉन असे हजारो साबण घेऊन आला आणि मित्रांच्या साहाय्याने आपल्या गॅरेज मध्येच एक छोटेखानी वर्कशॉप सुरु केले.त्याने बटाटे सोलावेत तसे साबणाचा बाहेरचा भाग सोलून काढला.त्यानंतर ग्राइंडर मध्ये टाकून या साबणांचा चुरा केला.हा चुरा वितळवून नंतर साबणांच्या मोल्ड मध्ये टाकला.एक रात्र सुकविल्यानंतर दुसऱ्या दिवशी साबणाच्या वड्या कापल्या. आणि नवीन साबण तयार ! या सगळ्यासाठी त्याने किचन मध्ये वापरली जाणारे टूल्सच वापरले.या त्याच्या गॅरेजमधून लवकरच तो दररोज ५०० साबण तयार करू लागला. साबण तयार तर होऊ लागले पण त्यांचं करायचं काय ? शॉनच्या वाचनात हे आले होते की जगभरात दररोज सुमारे ९,००० बालके अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांमुळे मरण पावतात. यापैकी निम्याहून जास्त मृत्यू केवळ नियमित हात धुतल्याने टाळता येऊ शकतात. आपण तयार केलेले साबण अनेक गरीब देशांतील या बालकांपर्यंत पोहोचविण्याचा शॉनचा प्रयत्न होता.यासाठीच त्याने नावाची संस्था सुरु केली.

कल्पना उद्दात्त असली तरी प्रत्यक्षात उतरवणे कठीण होते. हजारो हॉटेल्स मधून साबण गोळा करून, प्रोसेस करून, दूरवरच्या अनेक देशांत पोहोचविणे श्रेसळीींळली च्या दृष्टीने कठीण होते आणि यासाठी पैसा उभारावा लागणार होता. देणगी देणाऱ्या अनेक संस्थांकडे त्याने प्रयत्न केले पण पैसे उभे करणे जमत नव्हते.इकडे साबणाचा साठा पण वाढत होता. लवकरच काही केले नसते तर शॉनला हा पूर्ण प्रकल्पच बंद करावा लागणार अशी चिन्हे दिसत होती.तेव्हाच शॉन सिपलर ने एक नवीन बिझनेस मॉडेल वापरायचे ठरवले. त्याने स्वतःच्या संस्थेला एक प्लॅटफॉर्म बिझनेस बनविले. जसा उबर हा ग्राहक आणि टॅक्सीचालक यांना जोडणारा एक प्लॅटफॉर्म आहे तसा हा हॉटेल्स आणि गरजू बालके याना जोडणारा प्लॅटफॉर्म आहे. यात दोन्ही बाजूना फायदा व्हावा अशी योजना असते.शॉनने 'लश्रशरप' मध्ये सहभागी होणाऱ्या हॉटेल्सना प्रत्येक रूममागे १ डॉलर प्रति महिना अशी नाममात्र फी आकारायला सुरुवात केली.या फी मध्ये हॉटेल्सना तीन फायदे झाले.पहिला म्हणजे साबणाची विल्हेवाट लावण्याच्या जबाबदारीतून मुक्ती,दुसरा म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने पूर्ण करण्यासाठी मदत आणि तिसरा म्हणजे हॉटेलचा सोशल इम्पॅक्ट दाखविण्याची सोय ! त्याचसोबत या संस्थांसोबत काम करून साबणाची आवश्यकता जिथे आहे, तिथे ते पाठविण्याची सोय केली.लोकल क्लिनिक्स आणि शाळांसोबत या संस्था काम करतात.लहान मुलांना स्वच्छतेचे महत्व शिकवतात, साबण वाटप आणि वापराची देखरेखही करतात.सध्या 'उश्रशरप ८००० हॉटेल्स (१.५ मिलियन रूम्स) सोबत काम करत आहेत, जगभरात ८ पेक्षा जास्त देशांत साबण प्रोसेस करण्याचे कारखाने त्यांनी सुरु केले आहेत.

१२७ देशांत सात करोड साबण आतापर्यंत त्यांनी पोहोचवले आहेत, आणि हे करत असताना समुद्रात/जमिनीत जाणारा २३ मिलियन पाउंड कचरा कमी केला आहे.याचे सीरिया मधील रेफ्युजी,सोमालिया,बांगलादेश,पाकिस्तान,झाम्बिया,होन्डुरास हे आफ्रिकन देश सगळ्यात मोठे लाभार्थी ठरले आहेत.अजूनही जगातील ३ बिलियन लोकांकडे साबणासारखी साधी पण जीवनावश्यक सुविधा पोहोचलेली नाही आणि अजूनही हजारो हॉटेल्स साबण फेकून देत आहेत. पासून प्रेरणा घेऊन इतर देशांमध्येही असं काम करणाऱ्या संस्था उभ्या राहू लागल्या आहेत. शॉनने एकापेक्षा अधिक समस्या आपल्या युनिक आयडीयाने सोडवले आहेतच, तेही कुणाच्या देणगीवर अवलंबून न राहता एक प्रोफीटेबल बिझनेस उभारून !

आजही शॉन सगळ्यांना हेच सांगतो '.तुमच्या वॉशबेसिनवर पडून असलेला तो साबणाचा तुकडा कुणाचातरी जीव वाचवू शकतो...तो वाया घालवू नका !' तुम्ही देखील ही माहिति आपल्याकडे न ठेवता पुढे पाठवा...न जाणो कुणी शॉन हे वाचेल आणि जगाला वाचवेल !.

*******

सागर रामभाऊ तायडे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमुळे युवकांना मिळेल रोजगाराभिमुख प्रशिक्षण

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय तथा निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी इयत्ता बारावी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार रुपये, आयटीआय, पदविकाधारक प्रशिक्षणार्थींना ८ हजार रुपये आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय आस्थापना, उद्योग, महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के किंवा किमान एक उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, आणि विविध आस्थापना यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावी. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विभागामार्फत विद्यावेतन दिले जाईल. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना, उद्योग यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. या ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (डीबीटी) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी या वेबपोर्टलला भेट देवून योजनेमध्ये सहभागी होता येणार आहे. या वेबपोर्टलवर यापूर्वी उमेदवार किंवा आस्थापना, उद्योगांनी नोंदणी केलेली असल्यास उमेदवारांसाठी (उमेदवारांनी आपला रजिस्ट्रेशन क्रमांक व पासर्वडने लॉगीन करून आपली प्रोफाईल अपडेट करावी, व इतर तपशील मध्ये आपली माहिती उदा. बँकेचे नाव, आयएफएससी कोड, खाते क्रमांक, शाखा कोड, व आपले रहिवासी प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, व कॅन्सल चेक अपलोड करावे.) आणि आस्थापना, उद्योगांसाठी (आस्थापना, उद्योगांनी आपला रजिस्ट्रेशन क्रमांक व पासर्वडने लॉगीन करून ईपीएफ, ईएसआयसी, जीएसटी, सर्टिफिकेट ऑफ इन्कॉर्पोरेशन, डीपीआयटी व उद्योग आधार आदी माहितीसह आपल्या आस्थापनेची प्रोफाईल अपडेट करावी.)

***************

संकलन- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

# साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे : जागतिक स्तरावरील साहित्यिक

ज्यांच्या वाट्याला फक्त दीड दिवसाची शाळा आली त्याच साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यक्षेत्रात जागतिक स्तरावर स्थान मिळविले. त्यांची साहित्य संपदा जगातील सुमारे २२ भाषांत अनुवादित झालेली आहे.

त्यांची चित्रा, सुलतान या कादंबऱ्या रशियामध्ये घरोघरी वाचल्या जातात, तर त्यांनी लिहिलेला स्टॅलिनग्राडचा पोवाडा रशियातील घराघरात गावागावात आणि शाळा-महाविद्यालयात गायला जातो. इतका तो प्रेरणादायी आणि लोकप्रिय आहे. साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांनी १५ पोवाडे, एक नाटक, दहा लोकनाट्य, एक प्रवास वर्णन, तेवीस कथा आणि सुमारे ४० कादंबऱ्या लिहिल्या आहेत. इतका प्रतिभासंपन्न आणि बहुविध साहित्यिक मराठी भाषेत दुसरा झाला नाही.

प्राच्यविद्यापंडित शरद पाटील म्हणतात, 'अण्णा भाऊंच्या कादंबरीची तुलना करणारी भारतीय भाषात दुसरी कादंबरी नाही. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीची तुलना रशियन कादंबरीकार दोस्तोएवस्की यांच्याशीच होऊ शकते. यावरून स्पष्ट होते की अण्णा भाऊ साठे हे केवळ मराठी भाषा, महाराष्ट्र, भारत या चौकटीमध्ये मावणारे व्यक्तिमत्व नसून, ते जागतिक स्तरावरचे साहित्यिक ठरतात.

अण्णा भाऊ साठे यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. कष्टकरी, कामकरी, शेतकरी वर्गाच्या हक्क अधिकारासाठी ते लढले. मुंबईसह मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र आपल्या वाणीने -लेखणीने शाहीर अमर शेख ,शाहीर गव्हाणकर यांच्यासोबत ढवळून काढला.


'माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली' ही त्यांची छक्कड खूप गाजली. त्यांची ही छक्कड मराठी भाषेचे वैभव आहे. अत्यंत निस्वार्थ भावनेने त्यांनी सर्वसामान्य वंचित वर्गाच्या हक्कासाठी लढा दिला.

बालपणापासून त्यांच्या वाट्याला अत्यंत हलाखीचे जीवन आले. ओझी वाहिली, कोळसा वाचला, गिरणीत झाडू मारला. पोटासाठी त्यांना खूप संघर्ष करावा लागला. पण ते मागे हटले नाहीत. संकटाला संधी समजून त्यांनी लढाऊ वृत्तीने त्यावरती मात केली. आण्णा भाऊ साठे संकटात खचून जाणारे नव्हते. तर संकटाच्या नरडीवर पाय देऊन यशाची शिखरे गाठणारे आण्णा भाऊ होते.

गोरगरिबांचे दारिद्र्य नष्ट व्हावे, यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केला. आण्णा भाऊ म्हणत, 'दारिद्र हे फार क्रूर असते, आणि ते नग्न असते. ते नष्ट झाले पाहिजे.' यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. त्यांनी पंजाब दिल्लीचा दंगा, बंगालची हाक या कलाकृतीच्या माध्यमातून शांततेचे आवाहन केले. आण्णा भाऊ साठे म्हणत, 'शांतता ही पवित्र बाब आहे. दंगल करून आपला प्रश्न सुटणार नाही, तर शांततेच्या मार्गानेच आपले प्रश्न सुटतील.' अशी त्यांची भूमिका होती. गरिबांना न्याय मिळावा, ही त्यांची प्रामाणिक भूमिका होती.

आण्णा भाऊ साठे हे महान प्रतिभावंत साहित्यिक होते. परंतु साहित्याचा उपयोग त्यांनी समाजपरिवर्तनासाठी केला. एखादा प्रसंग उभा करण्यात त्यांचा हातखंडा होता. अचूक वर्णन करून एखादी व्यक्ती किंवा घटना याचे चित्रण करण्यात त्यांचा हातखंडा होता. प्राचीन काळामध्ये जनमानसाच्या मराठी भाषेला गाथासप्तशती, मध्ययुगीन काळात चक्रधरांचे लीळाचरित्र, संत नामदेवांची गाथा, संत तुकारामाचे अभंग, आधुनिक काळात महात्मा फुले यांचे साहित्य आणि साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य कवेत घेत इंग्रजाळलेल्या काळात जनमाणसाची मराठी साहित्यात आणली. आजचे आधुनिक साहित्यिक म्हणजे आण्णा भाऊ साठे आहेत. त्यामुळेच त्यांचा जन्मदिन मराठी भाषा दिन झाला पाहिजे. तो मराठी भाषेचा आणि आण्णा भाऊंचा ही सन्मान ठरेल

आण्णा भाऊ साठे यांचे मूळ नाव तुकाराम भाऊ साठे असे आहे. आण्णा भाऊ साठे हे आधुनिक महाराष्ट्राचे तुकाराम आहेत. त्यांनी आपल्या प्रतिभेच्या बळावर समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, दारिद्र्य, विषमता यावरती कडाडून हल्ला केला. आज देखील आपल्या समाजामध्ये पृथ्वीची निर्मिती ईश्वराने देवाने केलेले आहे. जगाचा नियंता ईश्वरच आहे. हे सर्व जग सजीव सृष्टी ईश्वर चालवतो आहे. अशी अंधश्रद्धा आहे. परंतु आण्णा भाऊ साठे म्हणतात, 'पृथ्वी ही शेष नागाच्या फण्यावर तरलेली नसून ती कष्टकरी, श्रमकरी ,शेतकरी वर्गाच्या तळहातावर तरलेली आहे. श्रमकऱ्यांनी श्रम नाही केले तर धनदांडगे फक्त नोटा खाणार नाहीत.'




श्रमकऱ्यांचा कैवार घेऊन आण्णा भाऊ साठेअन्यायाविरुद्ध सातत्याने लढत राहिले. हे जग बदलायचे असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गाने आपल्याला जावे लागेल. हे सांगताना अण्णा भाऊ साठे म्हणतात, 'हे जग बदल घालुनी घाव मज सांगून गेले भीमराव.'

आण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊ तर आईचे नाव वालुबाई होते. घरात प्रचंड गरिबी. दारिद्र्य हाच त्यांचा सखा नि सोबती होता. आण्णा भाऊंना वाटायचे आपण खुप शिकावे, म्हणून ते शाळेत गेले. गुरुजींनी त्यांना वर्गात बसू दिले नाही. एक दिवस ते वर्गाबाहेर बसूनच आत गुरुजी काय शिकवतात हे बाहेर बसून ऐकत होते. दुसऱ्या दिवशी धाडस करून ते वर्गात गेले. गुरुजींनी त्यांना दांडक्याने मारले. शिक्षण घेण्याच्या आशेने शाळेत गेलेल्या आण्णा भाऊंना मार खाऊनच घरी यावे लागले. ते फक्त दीड दिवस शिकले. पण पुढे जाऊन त्यांनी अक्षर ओळख करून घेतली आणि त्यांची प्रतिभेची गाडी सुसाट सुटली. गुणवत्ता आणि प्रतिभा ही कुणाची मक्तेदारी नाही. हे साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांनी जगाला दाखवून दिले.

वयाच्या दहाव्या वर्षी अण्णा भाऊ साठे आणि त्यांच्या परिवाराला वाटेगाव वरून मुंबईला जाण्यासाठी तिकिटाला पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे वाटेगाव ते मुंबई असा चारशे किलोमीटरचा प्रवास अण्णा भाऊंनी त्यांच्या परिवारासह पायीच सुमारे दोन महिने केला. उदरनिर्वाहासाठी कोळसे वेचायचे, झाडू मारायचा, ओझे उचलायचे; असे करत करत त्यांनी मुंबई गाठली. ज्या अण्णा भाऊंना वयाच्या दहाव्या वर्षी मुंबईला जाण्यासाठी तिकिटाला पैसे मिळाले नाहीत, त्याच अण्णा भाऊ साठे यांना रशियन सरकारने विमानाने बोलावून रशियामध्ये त्यांचा मोठा आदर सन्मान केला. अण्णा भाऊ साठे म्हणजे रशियन जनतेच्या गळ्यातील ताईत होते. त्यांची साहित्य संपदा रशियन भाषेमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे.

अण्णा भाऊ साठे आपल्या शिष्टमंडळासह जेव्हा रशियामध्ये पोहोचले, तेव्हा तेथील शासनातील अधिकाऱ्यांनी त्यांना विचारले, तुम्हाला काय पाहायला आवडेल. तेव्हा त्यांच्या शिष्टमंडळातील डॉक्टर म्हणाले आम्हाला या ठिकाणची वैद्यकीय सेवा पाहायची आहे. लोकप्रतिनिधी म्हणाले या ठिकाणी शासन व्यवस्था कशी चालते ते पाहायचे आहे. वकील मंडळी म्हणाली या ठिकाणची न्यायव्यवस्था पाहायची आहे. संगीतक्षेत्रातील सहकारी म्हणाले या ठिकाणचे कला, नाट्य, संगीत पाहायचे आहे. अण्णा भाऊ साठे म्हणाले, 'या ठिकाणचा मला फुटपाथ दाखवा आणि फुटपाथवर गोरगरीब कसे जगतात ते मला पाहयचे आहे. रशियामध्ये जरी गेले, तरी उपेक्षित, वंचित, गरिबांची नाळ कधी तुटली नाही. अण्णा भाऊ साठे संवेदनशील मनाचे होते.

अण्णा भाऊ साठे रशियात जाण्यापूर्वीच त्यांची कीर्ती रशियात पोहोचली होती, ती त्यांच्या साहित्यामुळे. तेथे त्यांना छत्रपती शिवाजी राजांवर अभ्यास करणारे प्राध्यापक चेलिशेव भेटले. कॉम्रेड पी. ए. बारनिकोव भेटले. रशियन लोकांना मराठी भाषा शिकविणाऱ्या प्राध्यापिका ततियाना कातेनीना भेटल्या, बाकु याठिकाणी हमीद साहेब भेटले. हमीद साहेब अण्णा भाऊंना पाहिल्या पाहिल्या म्हणाले शाहिरी अझीज. रशियामध्ये अण्णा भाऊ साठे यांनी ताश्कंद, मास्को, स्टालिनग्राड, बाकू, अझरबैजान इत्यादी ठिकाणी भेटी दिल्या. अनेक ठिकाणी त्यांचा सत्कार झाला.

मास्को येथील सत्काराला उत्तर देताना अण्णा भाऊ म्हणाले, 'छत्रपती शिवाजी राजांच्या मराठी मुलखातून मी या ठिकाणी आलो आहे. मास्कोमध्ये जाऊन छत्रपती शिवाजी राजांचा जयजयकार करणारे अण्णा भाऊ साठे होते.'फकिरा कादंबरीतील फकिरा म्हणतो, 'ही तलवार शिवाजीराजांनी माझ्या पूर्वजांना दिलेली तलवार आहे. गणपतीला वंदन करणारा गण बदलून, छत्रपती शिवाजी राजांना वंदन करणारा गण अण्णा भाऊंनी आणला. ते म्हणतात,

प्रथम मायभूच्या चरणा ।
छत्रपती शिवबा चरणा ।
स्मरणी गातो कवणा ।

छत्रपती शिवाजीराजे वरती अण्णा भाऊंची नितांत श्रद्धा होती. सर्वसामान्य रयतेचा वाली छत्रपती शिवाजी महाराज हे अण्णा भाऊ साठे यांचे प्रेरणास्थान होते.

आपल्या देशातील सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे. उत्तम आरोग्य मिळावे. दारिद्र्यातून मुक्तता व्हावी. सर्वांगीण विकासासाठी शांतता असावी. ही साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांची मनोमन इच्छा होती. त्यासाठी त्यांनी आजन्म संघर्ष केला. अण्णा भाऊ साठे हे जनमाणसाचे कैवारी होते. स्वतः दुःख भोगून इथल्या कष्टकरी श्रमकरी वंचितांना आनंद मिळावा. यासाठी संघर्ष करणारा महायोद्धा म्हणजे साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे आहेत. दीड दिवस शाळां शिकणाऱ्या या महान साहित्यिकाने मराठी भाषेचा कैवार घेतला. जनमाणसांच्या मराठी भाषेला साहित्यात आणले. ज्या भाषेतील कलाकृती अनुवादित होते ती भाषा वृद्धिंगत होते. मराठी भाषेचा कैवार घेऊन मराठी भाषेला वृद्धिंगत करणाऱ्या या महामानवाची जयंती 'मराठी भाषा दिन' म्हणून जर साजरा झाला, तर निश्चितच मराठी भाषेचा आणि अण्णा भाऊंचा सन्मानच ठरेल. अण्णा भाऊनां जयंतीनिमत्त विनम्र अभिवादन !

******

-डॉ. श्रीमंत कोकाटे

# शेतकऱ्यांची व्यथा जाणणारे लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे

आज लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांची १०४ वी जयंती आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष म्हणजे दलित, श्रमिक, कष्टकरी, शेतकरी, कामगार यांच्या दुःखाला ते स्वतःचे दुःख मानत. त्यामुळे आपल्या खणखणीत शाहिरीद्वारे त्यांनी सर्व जनतेचे दुःख जनतेसमोर अगदी परखडपणे मांडलेले दिसते. महाराष्ट्र मध्ये १९४९ ला संयुक्त महाराष्ट्र चळवळ उदयास आली. या चळवळीमध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर गव्हाणकर आणि शाहीर अमर शेख या तिघांचाही सहभाग होता. शेतकऱ्यांच्या अन्याय अत्याचाराला या तिघांनी वाचा फोडली ती 'लाल बावटा' या कलापथकाद्वारे... खरंतर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व त्यांचे सहकारी श्रमिक कामगार म्हणून राबत होते, त्यांनीही दुःख भोगले होते. त्या दुःखाची जखम त्यांच्या अंतर्मनाला भिडली होती. त्यांचे अंतर्मन तळमळत होते. आणि तळमळलेल्या त्यांच्या अंतर्मनाने वैचारिक लढा उभा केला. शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी स्थापन केलेल्या कलापथकाद्वारे ते विविध कार्यक्रम सादर करीत असत. ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथे

ऐतिहासिक स्वरूपाच्या शेतकरी मेळाव्यामध्ये त्यांनी एक कार्यक्रम सादर केला होता. शेतकरी हा जगाचा पोषणकर्ता आहे. परंतु सरकार मात्र शेतकऱ्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करते. जो शेतकरी आपल्या घरादाराची, कुटुंबाची पर्वा न करता जगाचे पोट भरण्यासाठी रात्रंदिवस कष्ट उपसतो अशा शेतकऱ्याबद्दल त्याच्या समस्येबद्दल लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांना जाण होती. म्हणूनच त्यांनी शेतकऱ्याला उद्देशून एक सुंदर लावणी गायली आहे.

तू मराठमोळा शेतकरी घोंगडी शिरी!<br>
जुनी ती काठी, जुनी लंगोटी!<br>
बदल ही दुनिया सारी रे!<br>
चल बदल ही दुनिया सारी रे!

या गीतामधून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शेतकऱ्यांना जग बदलविण्यासाठी प्रेरित करतात. शेतकरी पाऊस-पाणी, थंडी-वारा यांचा विचार न करता शेतामध्ये रात्रंदिवस राब राब राबतो आणि मोती पिकवितो. तो जेव्हा मोती पिकवितो त्यावेळी हे जग जगते. शेतकरी एवढ्या मेहनतीने कष्टाने पिकं पिकवितात आणि येथील सरकारी यंत्रणा शेतकऱ्यांनाच उपाशी ठेवते. त्यांच्या पिकाला योग्य तो मोल येत नाही. अगदी किरकोळ भावामध्ये त्यांची पिकं विकली जातात. त्यामुळेच अण्णा भाऊंना हा अन्याय सहन होत नाही ते शेतकऱ्याला 'जग बदल' असे आव्हान करतात.



लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी ७० वर्षापूर्वी सांगितलेली शेतकऱ्यांची व्यथा व आजच्या शेतकऱ्यांची परिस्थिती यामध्ये काहीच फरक दिसून येत नाही. शेतकरी आजही त्याच्याकडे शंभर ते दीडशे एकर शेती जरी असली तरी तो आर्थिक विवंचनेमध्ये दिसून येतो. याचे एकमेव कारण म्हणजे शेतीची मशागत करण्यासाठी शेतीमध्ये धनधान्य पिकविण्यासाठी शेतकरी सरकारकडून कर्ज काढतो आणि करतो व्याजाच्या स्वरूपात दुप्पट तिप्पट रकमेने सरकारला भरतो. भविष्यकाळात शेतकऱ्यावर येणाऱ्या संकटांची चाहूल अण्णा भाऊंना चाळीस वर्षांपूर्वीच लागली होती. त्यामुळेच त्यांनी शेतकऱ्यांना जागृत होण्यासाठी आपल्या शाहिरी द्वारे आवाहन केले.

तू खाशी कांदा, भाकरी बसुनि अंधारी!<br>
भुकेला कोंडा, निजेला धोंडा- बदल ही दुनिया सारी

शेतकऱ्यांबद्दल कितीही आत्मीयता अण्णाभाऊंच्या नसानसामध्ये भिनली आहे .. शेतकरी हा जगाचा निर्माता आहे. खरंतर तोच या जगाचा पोशिंदा आहे. परंतु सरकारचे व्याज भरून भरून तो भिकेला लागला. म्हणूनच अण्णा भाऊ साठेंनी शेतकऱ्यांना तत्कालीन परिस्थितीतील कायद्याविरुद्ध बंड करण्यास प्रेरित केले. त्या काळात अण्णा भाऊ हे शेतकऱ्यांचे नेतृत्व करत होते. पण आजच्या परिस्थितीमध्ये मात्र शेतकऱ्यांसाठी लढणारे नेते फार कमी आहेत. म्हणून तर शेतमालाच्या किमती पूर्वी होत्या तेवढ्याच आहेत. खतं बी बियाणं, अवजारे यांच्या किमती वाढल्या. आजच्या शेतकऱ्याला शेती करून परवडत नाही पण 'घेतला वसा सोडता येत नाही. अशा अवस्थेत शेतकरी जगतो. आजच्या पिढीला शेतीमध्ये स्वारस्य दिसून येत नाही. त्यामुळे ही पिढी हळूहळू शहराकडे स्थलांतरित होत आहे आणि खेडी ओस पडत आहे. सरकार सध्या ज्या काही योजना शेतकऱ्यांसाठी राबवत आहे. त्या योजनांची खैरात म्हणजे विकास नव्हे, खरंतर ह्या योजना शेतकऱ्यांना आळशी बनवितात. कष्टावर निष्ठा असणाऱ्या अण्णांना आजच्या या योजना पटल्या नसत्या. त्यांचा विश्वास फक्त शेतकऱ्यांच्या कष्टावरच होता, आज लोकशाहीर अण्णा भाऊ साठे असते तर शेतकऱ्यांवर अशी वाईट वेळ आली नसती. सध्या ग्रामीण भागा मध्ये विदारक परिस्थिती दिसून येते. शेतीमध्ये कष्टाने पिकविलेल्या पिकांना योग्य तो भाव न आल्यामुळे शेतकरी आपल्या शेतजमीनी विकत आहेत. शेतीच्या जागा आता प्लॉटिंगने घेतल्या. शेतीच्या ठिकाणी आज हिरवी गर्द पिके नव्हे तर सिमेंटची भली मोठी जंगलं दिसू लागली. खेड्यात जगणे आता लोकांना असह्य होत आहे. म्हणून शहरीकरण फार झपाट्याने वाढले. याचे मूळ कारण म्हणजे शेतीची बिकट अवस्था. आजचे सरकार मूळ प्रश्न सोडविण्याऐवजी त्यावर मलमपट्टी करताना दिसतात. शेतकऱ्यांची हीच मूळ समस्या, व्यथा अण्णा भाऊंनी ७० वर्षांपूर्वी अगदी पोट तिडकीने मांडली होती. त्यामुळे त्यांच्या कार्याची एक आठवण इथं मी सांगत त्यांच्या कार्यकर्तुत्वाला आदरांजली वाहतो आहे.

*******

-प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे<br>
जय क्रांती वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

# मधुमेहाच्या रुग्णांनी अशी घ्या, पायाची काळजी

शरीरातील साखरेची पातळी वाढणे किंवा हायपरग्लायसेमिया ही एक गंभीर आरोग्य समस्या आहे. उच्च साखरेची पातळी शरीरावर अनेक नकारात्मक प्रभाव पाडते. मधुमेहाची लक्षणे चटकन दिसत नसल्याने बहुतेक जण याबाबत गाफील असतात. पण, जेव्हा मधुमेह धोकादायक पातळीपर्यंत वाढतो आणि साखरेची पातळी झपाट्याने वाढते तेव्हा स्थिती गंभीरावस्थेत पोहोचलेली असू शकते. वास्तविक, मधुमेहींनी पायांचे नियमितपणाने निरीक्षण केल्यास शरीरात होणाऱ्या बदलांचे आकलन चटकन होऊ शकते.



पायात मुंग्या येणे आणि सुन्न होणे : रक्तातील साखरेची उच्च पातळी नसांना हानी पोहोचवू शकते. याला डायबेटिक न्यूरोपॅथी म्हणतात. यामुळे पायांना मुंग्या येणे, जळजळ होणे आणि बधिरपणा येऊ शकतो. संशोधनानुसार, मधुमेह असलेल्या रुग्णांपैकी सुमारे ५० टक्के रुग्णांना डायबेटिक न्यूरोपॅथीचा सामना करावा लागतो. यामध्ये हातपाय थरथरणे, जळजळ होणे आणि वेदना होणे यांचा समावेश असतो. यानंतर हे अवयव सुन्न होऊ लागतात. जेव्हा रक्तातील साखरेची पातळी खूप जास्त होते तेव्हा रक्तवाहिन्यांची भिंत कमकुवत होऊ लागते. त्यामुळेच नसा फुटण्याचीही भीती निर्माण होते.जखमा हळूहळू बरे होणे : मधुमेहामुळे शरीराची बरी करण्याची क्षमता कमी होते. यामुळे पाय आणि घोट्यांवर झालेल्या जखमा बऱ्या होण्यास वेळ लागतो. यामुळे जंतुसंसर्गाचा धोका वाढतो. पायांची त्वचा कोरडी पडणे: रक्तशर्करेची पातळी जास्त झाल्यास शरीरात द्रवपदार्थाची कमतरता निर्माण होऊ शकते. यामुळे पायांची त्वचा कोरडी होते आणि टाचांना भेगा पडतात. ही स्थिती वेदनादायक असू शकते आणि संसर्ग होऊ शकते. पायाच्या नखांचा संसर्ग : मधुमेही रुग्णांना बुरशीजन्य संसर्ग होण्याची शक्यता सर्वांत जास्त असते. कोव्हिड काळात याविषयी बरीच चर्चा झाली होती. बुरशीजन्य संसर्गामुळे मधुमेहींची नखे पिवळी, जाड आणि ठिसूळ होऊ शकतात. वेळेवर उपचार न केल्यास हा संसर्ग गंभीर स्वरूप धारण करू शकतो. पाय दुखणे आणि कमजोरी: उच्च साखरेची पातळी मज्जातंतूंवर परिणाम करू शकते.

# विश्वकर्मीय सुतार समाजाला कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधू नये!

राज्यस्तरीय नामकरणाचा गवगवा करणाऱ्या सामाजिक संघटना सुतार समाजात असंख्य परंतु,लाखोंच्या संख्येने सुतार समाज बांधवांना एकत्रित करणारी एकही संघटना,नेता समाजात नाही हि सत्य परिस्थिती सुतार समाजात आहे.स्वतःच्या स्वार्थासाठी स्वतःच्या मोठेपणासाठी संपूर्ण राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधण्याचा अधिकार विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात कोणालाही नाही विशेषतः कोणीही स्वयंघोषित समाज नेत्यांनी संपूर्ण विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला गृहीत तसेच वेठीस धरू नये आणि संपूर्ण विश्वकर्मीय सुतार समाजाचे मालक समजू नये. सामाजिक क्षेत्र किती टक्के समाज बांधवांना समजते आणि समाजात किती टक्के समाज जागृत आहे हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहील.

संपूर्ण राज्यस्तरीय आदर्श विश्वकर्मीय सुतार समाजाच्या नावावर समाजातील कोणीही स्वतः ची सामाजिक,राजकीय पोळी भाजून घेणे निव्वळ हास्यास्पद ठरेल असा प्रकार फक्त नावासाठी आणि मोठेपणासाठी खोटेपणाचा निर्लज्जपणा ठरेल.सामाजिक क्षेत्रात सर्व समाजसामान्य एकखांबी खंबीर नेतृत्वाची लोकशाही मार्गाने निवड प्रक्रिया समाजातून झालेली नाही त्यामुळे समाजात कोणीही स्वतःला संपूर्ण समाजाचे समाज नेतृत्व म्हणवून घेऊ नये आणि संपूर्ण राज्यस्तरीय विश्वकर्मीय सुतार समाजाचे ठेकेदार सुद्धा समजू नये समाजाला कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न करु नये विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज कोणाचीही खाजगी मालमत्ता नाही संपूर्ण समाजाला गुलामगिरीच्या जोखडात अडकवण्याचा कोणीही प्रयत्न करू नये विश्वकर्मीय सुतार समाज आदर्श आणि स्वाभिमानी सुध्दा आहे.

सुतार समाजात कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांनी राज्यभरात तळागाळातील उपेक्षित खेड्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना आर्थिक दृष्टीने सक्षम करण्यासाठी खेडोपाडी गावागावात वाडीवस्ती मध्ये किती लाख उद्योग व्यवसाय उभारणी केली त्याची पुराव्यानिशी माहिती समाजात जाहीर प्रसिद्ध करावी सोबतच समाजात ओबीसी,जनगणना,संविधान,आरक्षण इत्यादी विषयावर किती वेळा आणि कोण कोणत्या जिल्ह्यात समाज जागृती निर्माण करण्यासाठी लाखोंच्या संख्येने विश्वकर्मीय सुतार समाज बांधवांना उपस्थित करून समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले त्याची जाहीर माहिती प्रसिद्ध करावी कारण विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहे समाजात स्वतःला समाज नेते म्हणवून घेणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित सुतार समाज नेत्यांना मात्र याचा विसर पडू नये.

समाजातील कोणत्याही एका संघटनेचा अथवा कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांचा पाठींबा जाहीर करणे म्हणजे संपूर्ण समाजाची आणि संबंधित राजकीय पक्षाची,राजकीय नेत्यांची निव्वळ दिशाभुल ठरेल विशेषतः कोणत्याही एका राजकीय पक्षाची हुजरेगिरी चमकोगिरी ठरेल याचे भान राज्यस्तरीय सुतार समाजातील कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांनी ठेवावे यालाच खऱ्या अर्थाने सामाजिक वैचारिक नैतिक जबाबदारी म्हणता येईल.सुतार समाज बांधव सूज्ञ आहेत कोणाला मतदान करायचं याच ज्ञान समाज बांधवांना आहे.कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांच्या ओंजळीने पाणी पिणारा समाज नाही याची जाणीव समाजातील स्वयंघोषित पुढाऱ्यांना असावी संपूर्ण सुतार समाज दुधखुळा नाही.

संपूर्ण राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज ३६ जिल्ह्यातील जवळजवळ ३६० तालुक्यातील खेडोपाडी वाडीवस्ती शहरात विस्तारित आहे विशेषतः सामाजिक क्षेत्रात जवळपास २०० विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक संघटना,संस्था,प्रतिष्ठान कार्यरत असतील.संपूर्ण राज्यातील विश्वकर्मीय ओबीसी बुद्धिवान बुद्धिप्रामाण्यवादी सुतार समाजाची लोकसंख्या जवळपास ५० लाख असल्याचे सोशल मीडियावर माझ्या वाचण्यात आलेले आहे.वास्तविक पाहता समाजाची लोकसंख्या नेमकी किती लाख आहे याबाबत जनगणना संदर्भात ठोस पुरावा कोणाकडेही उपलब्ध नाही आणि सरकारने सुध्दा याबाबत खरी आकडेवारी जाहीर केलेली नाही याची नोंद ओबीसी सुतार समाजातील तथाकथित स्वयंघोषित सुतार समाज नेत्यांनी घ्यावी.

देशात मतदान करण्याची गुप्त पद्धत आहे मतदान हा प्रत्येकाचा अधिकार आहे आणि मतदान कोणाला करायचे याचा अधिकार मात्र मतदारांना असतो तसेच प्रत्येक जण सूज्ञ आहे.समाजातील काही बोटावर मोजता येतील असे पाच दहा समाज बांधव अथवा पाच दहा सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी म्हणजे संपूर्ण समाज म्हणता येणार नाही समाजात अनेक संघटना,संस्था,प्रतिष्ठान कार्यरत असतीलच आणि पाठिंबा कोणाला द्यावा याचा अधिकार कोणत्याही सामाजिक संघटनेला नाही एखादी संघटना कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा जाहीर करीत असेल तर असा पाठिंबा संपूर्ण समाजाचा आहे असे गृहीत धरता येणार नाही.

भारतीय संविधानात लोकशाही अभिप्रेत आहे मतदान कोणाला करावे याचा सर्वस्वी अधिकार मतदारांना आहे सुतार समाजातील बोटावर मोजता येतील असे पदाधिकारी काही स्वयंघोषित समाज नेते म्हणजे संपूर्ण समाजाचे मालक नाहीत आणि संपूर्ण सुतार समाजाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्याचा अथवा घोषित करण्याचा अधिकार समाजातील कोणत्याही सामाजिक संघटना,संस्था,प्रतिष्ठानला नाही सोबतच कोणत्याही स्वयंघोषित सुतार समाज नेत्यांना असा पाठिंबा जाहीर करण्याचा मात्र अधिकार नाही याची जाणिव समाजातील प्रत्येक सुशिक्षित सूज्ञ चिकित्सक सुतार समाज बांधवांनी ठेवावी आणि कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांनी संपूर्ण समाजाला गृहीत धरुन स्वतःचा मोठेपणा करु नये अशी विनंती आणि सूचना मी एक जबाबदार समाज बांधव म्हणून करतो तसेच तर्कशुद्ध मुद्देसूद आणि संवैधानिक पध्दतीने खुलासा करण्यास सुद्धा तयार आहे.

विश्वकर्मीय सुतार समाज हा मुळात ओबीसी प्रवर्गातील एक मोठा ओबीसी घटक असून समाजात ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून मी विविध विषयांवर लिखाण केलेले आहे आणि राज्यातील विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले आहे परंतु,समाजाचे दुर्दैव म्हणावे लागेल माझ्या समाज लिखाणावर कार्यपद्धती करण्यासाठी अथवा विचार मंथन समाज चिंतन करण्यासाठी समाजातील एकही स्वयंघोषित समाज नेता अथवा एकही सुतार सामाजिक संघटना,संस्था,प्रतिष्ठान जबाबदारी पूर्वक पुढे आलेले नाही हिच मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.ज्या स्वयंघोषित समाज नेत्यांना अथवा ज्या सामाजिक संघटना,संस्था,प्रतिष्ठानला माझं समाज लिखाण हवे असेल त्यांना मी विविध वर्तमान पत्रात ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून विविध विषयांवर केलेल्या समाज लिखाणाचे समाज लेख सुध्दा पाठवू शकतो.विश्वकर्मीय सुतार समाजातील कोणतीही एक संघटना संपूर्ण समाजाचे मालक नाहीत! म्हणूनच विश्वकर्मीय सुतार समाजाला कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधू नये!

प्रमोद सूर्यवंशी चिखली मातृतीर्थ बुलडाणा मोबाईल क्रमांक:-८६०५५६९५२१.

# पावसाळ्यातलं पथ्यपान



पावसाळ्यात साधी सोपी ऋतुचर्या जर आपण स्वीकारली तर संसर्गाविना निरोगी राहता येईल. पावसाळ्याच्या दिवसात लघू आणि गरम म्हणजेच उष्ण गुणाचा आहार घ्यावा. या ऋतूत ओवा, हळद, मिरी, सुंठ यांची पावडर करून भाकरी, चपातीत वापरल्यास उत्तम. मांसाहारी व्यक्तीने पावसाळ्यात मांस खाण्यापेक्षा त्याचे सूप करून प्यावे. यातही सुंठ, मिरी, पुदिन्याचा सढळ हाताने वापर करावा. आपल्या आहारातील विविध अन्नपदार्थ तयार करण्यासाठी आपण जे धान्य वापरतो ते जुने असावे. पण एक वर्षापेक्षा अधिक जुने मात्र शक्यतो असू नये. ज्वारीची भाकरी, कमी तेलाच्या पोळ्या, गरम दूध, शक्यतो मुगाचे वरण, भात अशी आहाराची मांडणी असावी. नवीन धान्य वापरायचे असेल तर ते धान्य भाजून घेतल्यास अधिक चांगले. त्यामुळे अशा भर्जित धान्यवत अग्नीचे संस्कार होऊन ते शरीरातील अग्नीकडून पचविण्यास हलके - लघू बनते. आठवड्यातून एकदा लंघन करावे. तेलापेक्षा साजूक तुपाचा अधिक वापर करावा. या दिवसांत ताजे व गरम अन्न सेवन करावे. पचनास हलका, शक्तिदायक, शुष्क आहार घ्यावा. या ऋतूमध्ये स्वयंपाकामध्ये मुरे, जिरे, हिंग, सुंठ, लिंबू, लसूण, कांदा, आले, कडुलिंब यांचा नेहमीपेक्षा थोडा अधिकच वापर करावा. कारण हे सर्व पदार्थ उष्ण असून पचण्यास हलके असे आहेत. ते आहाराच्या पचण्यास खूपच साहाय्यकारी ठरतात. पावसाळ्यात सर्वसामान्य आहारात लाह्या, भाकरी, चपाती, दूधभात, पिठले चालेल. पावसाळ्याच्या काळात दिवसा झोपणे, जास्त परिश्रम, रूक्ष पदार्थ सेवन हे आयुर्वेदाने निषिद्ध मानले आहे. ते टाळलेले बरे. दह्याऐवजी ताक घ्यावे. तेदेखील ताजे, पातळ व जिरे, हिंग, काळे मीठ घालून प्यावे. ताक नसेल तर आयत्यावेळी दह्यामध्ये थोडे पाणी घालून, घुसळून ताक करून घ्यावे. दही ताजे असावे. आंबट, शिळे असू नये. आहाराचे प्रमाणही पावसाळ्याच्या सुरुवातीस अधिक असू नये. जसजसा अग्नी प्रदीप्त होईल म्हणजेच भूक वाढेल तशी आहाराची मात्रा वाढवावी. पचण्यास जड, शिळा, थंड असा आहार टाळावा. पोटात कळ येणे, द्रवमल प्रवृत्ती होणे यासाठी शंखवटी, संजीवनी वटी, मोचरस, कर्पूरवटी इ. चा उपयोग करावा. अर्थात यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे हितकारक. पावसाळ्याच्या दिवसात पचनसंस्था आणि जठराचे काम मंदावते. परिणामी, शरीरात इन्फेक्शन होण्याचे प्रमाण वाढते. पावसाळ्याच्या काळात सर्व प्रकारच्या भाज्या व फळे स्वच्छ धुवून घ्यावीत. फळभाज्या स्वच्छ धुतल्या नाहीत तर पोटाचे विकार होण्याची शक्यता वाढीला लागते. मोजकेच तेल, वात कमी करणारे आहे, तर साजूक तूप, वात आणि पित्त दोन्ही कमी करणारं आहे. पावसाळ्यात वात आणि पित्त दोन्ही वाढलेले असते, म्हणून जमल्यास अन्नपदार्थ साजूक तुपात बनवावेत. वनस्पती तुपात नव्हे. तेलातील विशिष्ट घटकामुळे पित्त वाढते आणि वर्षा ऋतूत पित्तसंचयाचा ऋतू! म्हणून तेलात तळलेले पदार्थ या दिवसात खाऊ नयेत. पावसाळ्यात गरम भजी, बटाटेवडे खावेसे वाटले तरी, प्रमाणात खावेत. या दिवसांत हलके जेवण पचण्यास सोपे असते. तेल तसेच मसाल्याच्या पदार्थांपासून शक्यतो दूर राहावे. बराच काळ उघड्यावर राहिलेले खाद्यपदार्थ शरीरात इन्फेक्शन निर्माण करू शकतात. या दिवसात पालेभाज्यांमध्ये माठाची भाजी योग्य. शिवाय दुधी, दोडका, पडवळ, भेंडी अशा वातशामक भाज्या अधिक प्रमाणात घ्या. पावसाळ्यात नदी, नाल्यांना पूर येतो, ते जलसाठ्यात येतं, तेच पिण्याच्या संपर्कात येतं, यासोबत पहिल्या पावसात अशुद्ध पाण्याचं प्रमाण अधिक असतं, म्हणून हगवण, उलट्या, जुलाब, पोट बिघडणे, गॅस धरणे, आव पडणे यासारख्या तक्रारी वाढतात.

# 'वास न येणं' ठरू शकतं हृदयविकाराचं पहिलं लक्षण? पण असं का घडतं, यावर उपचार काय? जाणून घ्या डॉक्टरांकडून

करोना महामारीला चार वर्ष पूर्ण झाली असली तरीही अनेकांना त्या काळात बऱ्याच संकटांचा सामना करावा लागला आहे. काही जणांना या दरम्यान कोणत्याही गोष्टींचा वास येत नव्हता, तर काही जणांच्या जिभेवरची चवसुद्धा कमी झाली होती. यातले काही जण बरे झाले आहेत, पण काही जण अशाच काही समस्यांना अजूनही तोंड देत आहेत. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अलीकडील अभ्यासात असे आढळून आले आहे की, 'वास व चव' या दोन संवेदना ओळखण्यात तारांबळ उडणे वृद्ध प्रौढांमध्ये एक सामान्य समस्या आहे. पण, ही बाब हृदयविकार असण्याचे संकेत दर्शवू शकते. तर याचबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने क्लिनिकल तज्ज्ञांशी संवाद साधला. वास येण्याची क्षमता कमी होणं हे खरोखरच हृदयाच्या संबंधित समस्या दर्शवते का? आणि हे खरं असेल तर हे टाळण्यासाठी काय केले जाऊ शकते, याबद्दल अधिक जाणून घेतलं. तर याबद्दल चर्चा करताना 'वास न येणं किंवा पूर्ण जाणं ' हे हृदयविकार रोगाचे सुरवातीचे लक्षण असू शकते, असे निदर्शनास आले. वास येण्याची क्षमता कमी होणं किंवा पूर्ण जाणं हे न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांच्या सुरुवातीच्या प्रक्रियेशी आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी पॅथॉलॉजीजसारख्या सामान्य रोगांशी संबंधित असू शकते; असे बंगळुरूच्या स्टर व्हाईटफील्ड हॉस्पिटलचे इंटरव्हेंशनल सल्लागार डॉक्टर चिराग डी. म्हणाले आहेत. पण असं का घडतं? वास घेण्याची क्षमता ही हृदयविकारातील दुवा, रक्तवाहिन्यांच्या आरोग्याशी संबंधित आहे. गंध ओळखण्याची क्षमता नाकावाटे रक्ताच्या सामान्य प्रवाहावर आणि आकलनासाठी जबाबदार असलेल्या इतर भागांवर अवलंबून असते. न्यूरोडीजनरेटिव्ह प्रक्रिया एकाच वेळी हृदय आणि नाक या दोन्ही मार्गांवर परिणाम करतात, असे डॉक्टर चिराग डी. म्हणाले आहेत.

अस्तर आरव्ही हॉस्पिटलमधील शस्त्रक्रिया करणारे सल्लागार डॉक्टर दिवाकर भट यांनीसुद्धा वरील गोष्टींवर सहमती दर्शविली आहे. त्यांच्या मते, अत्यंत कमकुवत हृदय असलेल्या व्यक्तींमध्ये, नाकावाटे मज्जातंतू क्षेत्रासह, शरीराच्या सर्व अवयवांना रक्तपुरवठा कमी होतो, जी वासाची भावना व्यक्त करणारा एकमेव मार्ग आहे; यामुळे गंधाची भावना कमी होऊ शकते. कमी वास येणं किंवा वास न येणं हे नाकाच्या मज्जातंतूवर परिणाम करणारी मेंदूची स्थिती किंवा यांचा समावेश होतो. त्याचा हृदयाच्या कार्याशी संबंध नाही; असेही डॉक्टर दिवाकर भट म्हणाले आहेत. कमी वास येणं किंवा वास न येणं म्हणजे काय? यूपीएसआयटी (युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनिया स्मेल आयडेंटिफिकेशन टेस्ट) किंवा स्निफिन स्टिक्स टेस्ट यांसारख्या चाचण्या हायपोस्मिया किंवा कमी वासाची भावना मोजू शकतात. हे मूल्यांकन एखाद्याच्या विविध वासांना ओळखण्याच्या, निवडण्याच्या किंवा वेगळे करण्याच्या क्षमतेचे मूल्यांकन करतात. जर एखाद्या व्यक्तीने या चाचण्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी गुण मिळवले



तर त्याचा अर्थ असा होतो की, त्याला वासाचा विकार आहे, असे डॉक्टर चिराग डी. म्हणाले आहेत. त्यांच्या मते, वास घेण्याची क्षमता कमी असलेल्या व्यक्तींमध्ये वृद्ध, न्यूरोडीजनरेटिव्ह रोग (जसे की अल्झायमर आणि पार्किन्सन्स), सायनसच्या तीव्र समस्या किंवा नाकावाटे श्वास घेण्यास अडथळे येणारे लोक, नुवांशिक परिस्थिती असलेल्या लोकांचा समावेश होतो. धूम्रपान, पर्यावरणातील विषारी पदार्थांचा संपर्क आणि खराब हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी अनेक गोष्टी वास न येणे या कार्यास कारणीभूत ठरू शकतात.

या समस्येवर काम करता येईल का? डॉक्टर चिराग डी. यांनी सांगितले की, या परिस्थितीत सुधारणा होणे शक्य आहे. मूलभूत आरोग्य समस्यांचे निराकरण करणे, सायनस संसर्गावर उपचार करणे, उदाहरणार्थ, विषारी पदार्थांशी संपर्क कमी करणे किंवा हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी तंदुरुस्ती वाढवणे आदी अनेक गोष्टी केल्यास या समस्येचा त्रास कमी होऊ शकतो.

# अण्णाभाऊंच्या जयंती निमीत्त 'जी -२४' ने केले पदयात्रेने शहरातील महापुरुषांना अभिवादन!

लातूर - येथील विविध परिवर्तनवादी संघटनांच्या प्रतिनिधींचा ग्रूप असलेल्या ' जी -२४' च्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त पदयात्रा काढून शहरातील महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले.

प्रकाशनगर मधील ' प्रबोधन ' वर निळा ध्वज फडकावून पदयात्रा निघाली. अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे अध्यक्ष यु.डी. गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मुख्य रस्त्याने निघालेल्या या पदयात्रेतील कार्यकर्त्यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीराव फुले , राजर्षी शाहू महाराज आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांना पुष्पा हार घालून अभिवादन करण्यात केले. कार्यकर्त्यांच्या



खांद्यावरील निळे ध्वज आणि महापुरुषांच्या जयघोषांने ही पदयात्रा लोकांचे लक्ष वेधून घेत होती. या पदयात्रेत ' जी- २४ ' चे कार्यकर्ते सर्वश्री रामराजे आत्राम, पांडूरंग देडे, इंजि. श्रीधर शेवाळे, श्रीमती महानंदा शेवाळे, माधव बावगे, प्राचार्य आर.डी. निटूरकर, प्रा.डॉ. निशीकांत वारभुवन, प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, नरसिंग घोडके, श्रीहरी कांबळे, प्रमोद कांबळे, सुभाष सूर्यवंशी,सावळाराम कासारे, तानाजी काळे, अंगद नेटके, ॲड. राजकुमार गंडले, ॲड. दिपक साठे, ॲड. किरण कांबळे, ॲड. संतोष मस्के, एल.आर. कांबळे, श्रीमती लक्ष्मी कांबळे, एम.के. शिंदे, जी.ए. गायकवाड, खंडू भोजराज,डी.उमाकांत आदी मान्यवरांसह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# साहीत्य रत्न अण्णा भाऊ साठे यांची गंगणे शाळेत जयंती उत्साहात साजरी



लातूर :--- साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती मातोश्री नामर्दादेवी गंगणे माध्यमिक शाळा व कर्मवीर अण्णासाहेब पाटील प्राथमिक शाळेत उत्साहात साजरी या वेळी प्रमुख पाहुणे दीपक गंगणे मुख्याध्यापक श्री लोखंडे सर,मुख्याध्यापिका सौ बालवाड ,माने सर यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे दीपक गंगणे यांनी आपल्या भाषणात वंचित आणि शोषितांच्या व्यथा आपल्या साहित्यातून आणि पोवाड्याच्या माध्यमातून मांडुन सामाजिक अन्यायाविरुद्ध वाचा फोडणारे,ज्येष्ठ शाहीर, अण्णा भाऊ साठे यांचे जीवन मार्गदर्शक असल्याचे सांगितले प्रमुख पाहुणे , विद्यार्थी यांचे समुचित भाषणे झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनापुरे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन अन्नपूर्णा गंगणे यांनी व्यक्त केले यावेळी शिक्षक विद्यार्थी ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# व्ही एस पँथर्स च्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

लातूर :- येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन व्ही एस पँथर्स च्या आंबेडकर चौक येथील मध्यवर्ती कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनहोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि या सामाजिक उपक्रमाला शुभेच्छा दिल्या त्यांच्यासोबत लातूर महानगरपालिकेचे अतिक्रमण विभाग प्रमुख रवी कांबळे हे देखील उपस्थित होते रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली. या या रक्तदान शिबिराच्या वेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन भाऊ मस्के संघटनेचे ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे मार्गदर्शक संतोष मांदळे रवि कुरील संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड शहराध्यक्ष असद भाई शेख ग्रुप शहराध्यक्ष संतोष जाधव कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे युनुस भाई जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड शेख यासीन शेख रमजान शेख जगदीश सरवदे, सुरज सूर्यवंशी अनिल कांबळे



ऑटो युनियनचे शहर अध्यक्ष शाहरुख मणियार मनोज गायकवाड, औसा तालुका अध्यक्ष सुनील सातपुते चाकुर तालुका अध्यक्षा अजय वाघमारे औसा शहराध्यक्ष महेश कांबळे अतुल होळकर मनोज कांबळे प्रमोद गाडेकर ,सतीश जाधव, चेतन भगत ,प्रशांत सातपुते ,बापू सरवदे ,बालाजी सोनवणे, विठ्ठल मस्के, अंकुश आप्पा , बबलू कांबळे, परमेश्वर गायकवाड ,बालाजी गायकवाड, सचिन बनसोडे, विष्णू सावंत, समाधान ढोबळे ,समाधान गायकवाड, बबलू जोगदंड मयूर सोनवणे यांच्यासह या शिबिरामध्ये जिल्हाध्यक्षाच्या पत्नी आम्रपाली किणीकर यांनी सुद्धा रक्तदान केले, जिल्हाभरातील पदाधिकाऱ्यांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन १०४ रक्त बाटल्यांचे संकलन यावेळी करण्यात आले यावेळी लातूर ब्लड बँकेचे सर्व कर्मचारी यांनी रक्तसंकलनासाठी परिश्रम घेतले.

# कापड्याच्या दुकानात चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला, १ लाख २८ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- कापड्याच्या दुकानात चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला, १ लाख २८ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अटक. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर जिल्ह्यातील रेणापूर पोलीस ठाणे हद्दी मध्ये रात्रीच्यावेळी एका कपड्याच्या दुकानाचा पत्रा काढून साड्या व कपडे चोरल्याची घटना घडली होती. त्यावरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या.

सदर पथकाकडून गुन्ह्याचा तपास सुरू असताना वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी गुप्त बातमीदाराकडून नमूद गुन्ह्यातील आरोपींची माहिती मिळाली.

सदर पथकाने नमूद गुन्ह्यातील आरोपीला दिनांक ३०/०७/२०२४ रोजी कळंब तालुक्यातील पाथर्डी येथून ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव १) दादा बब्रुवान पवार, वय ४५ वर्ष राहणार पाथर्डी तालुका कळंब जिल्हा धाराशिव (उस्मानाबाद) असे असल्याचे सांगितले.

त्याच्या घराची झडती घेतली असता घरा मध्ये नवीन साड्या व कपडे मिळून आले. त्याबाबत त्याच्याकडे



विचारले तेव्हा त्याने त्याच्या पत्नीसह लातूर जिल्ह्यातील रेनापुर येथील एका कपड्याच्या दुकानात चोरी केल्याचे व त्यामध्ये चोरलेले साड्या व कपड्याचा मुद्देमाल असल्याचे कबूल केले.

त्यावरून नमूद आरोपीस त्याने चोरलेल्या मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेल्या मोटार सायकलसह पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे रेणापूर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. असून त्याच्या सोबत असलेल्या त्याच्या पत्नीचा शोध सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उप-निरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार रामहरी भोसले, मोहन सुरवसे, योगेश गायकवाड, प्रकाश भोसले, सुरेश कलमे, प्रदीप चोपणे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार पुणेकर, पोलीस अमलदार गोरोबा इंगोले, अंकुश बिराजदार यांनी केली आहे.

# पुढचा मुख्यमंत्री मीच : रामदास आठवले

पुणे: प्रतिनिधी शिवसेना ठाकरे गटप्रमुख उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामधील वाद मिटला नाही तर राज्याचा पुढील मुख्यमंत्री मीच असणार असे सर्वात मोठे विधान रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि मंत्री रामदास आठवले यांनी केले आहे. पुण्यामध्ये ते माध्यमांशी बोलत होते.

गेल्या दोन दिवसांपासून उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये जोरदर कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळत आहे. राजकारणात एकतर तु राहशील किंवा मी राहीन असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांना थेट इशारा दिला आहे. तर माझ्या नादाला लागाल तर सोडत नाही, असे म्हणत फडणवीस यांच्याकडूनही ठाकरेंना आव्हान देण्यात आले आहे. याबाबतच बोलताना रामदास आठवले यांनी महत्वाची प्रतिक्रिया दिली आहे.



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त रामदास आठवले हे पुण्यामध्ये आले आहेत. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ठाकरे- फडणवीस वादावर भाष्य केले. उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांचा वाद जर संपला नाही तर पुढचा मुख्यमंत्री मीच असणार असे रामदास आठवले यावेळी म्हणाले..

# सोलापूर- तुळजापुर- धाराशिव रेल्वेमार्गासाठी संपादित जमीनीचा मावेजा थेट खरेदीप्रमाणे द्या - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

धाराशिव :- लातूर- मुंबई, या गाडीस कळंब रोड (तडवळा) व नांदेड- पनवेल या गाडीस ढोकी येथे थांबा देण्यासह सोलापूर- तुळजापुर- धाराशिव रेल्वे मार्गाकरीता जमीनीचे भुसंपादन ८० टक्के पुर्ण करुनच रेल्वे मार्गाची निविदा काढण्यात यावी अशा मागण्या खासदार ओमप्रकाश राजेंनिंबाळकर यांनी लोकसभेत केली. )

धाराशिव -तुळजापूर - सोलापूर या रेल्वे मार्गाकरीता संपादित केलेल्या जमीनीचा मावेजा आकांक्षीत जिल्हा म्हणून थेट खरेदी प्रस्तावाप्रमाणे शेतकऱ्यांना द्यावा. या रेल्वे मार्गाचे भुसंपादन ८० टक्के पुर्ण झालेले नसतानाही रेल्वे मार्गाचे टेंडर काढण्याच्या हालचाली सुरु असल्याची बाब खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी निदर्शनास आणुन दिली.




कोरोना महामारीमध्ये जेष्ठ नागरीक, दिव्यांग, पत्रकार यांसाठी असणाऱ्या रेल्वेच्या सवलती पुर्ववत सुरु कराव्यात, लातूर- मुंबई, बिदर- मुंबई रेल्वे गाडयांना अतिरिक्त जनरल डब्बे जोडावेत,या दोन्ही गाडयांमध्ये मोठया प्रमाणात प्रवाश्यांची ये जा सुरु असते त्यामुळे रेल्वे गाडयांचे जनरल डब्बे ओव्हर क्राऊड असतात. त्यामुळे धाराशिव व बार्शी स्थानकावरुन जनरल बोगीने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना जागा मिळत नाही. दोन्ही गाडयांना जनरल बोगीची संख्या वाढवण्यात यावी अशा मागण्या खासदार राजेनिंबाळकर यांनी यावेळी केल्या.

रेल्वे विभागाकडून वारंवार शेतकऱ्यांच्या जमीनीवरती विविध विकास कामाकरीता अतिक्रमण केले जाते. शेतकऱ्यांच्या वारंवार तक्रारी येत असून रेल्वे विभागाने शेतकऱ्यांचे संपादित जमीनीमध्ये त्यांची सिमा निश्चीती करुन घ्यावी, शेतकऱ्यांच्या जमीनीमध्ये अतिक्रमन करु नये किंवा ही जमीन रेल्वे विभागाच्या मालकीची असल्याचे सबळ पुरावे द्यावेत अशी मागणी यावेळी केली.

लातूर येथील रेल्वे कोच फॅक्टरीचे दोन वेळा निवडणुका तोंडावर आल्यानंतर उद्घाटन करण्यात आले. अनेक वर्षाचा कालावधी जावूनही रेल्वे कोच फॅक्टरीमधून अद्याप उत्पादन सुरु नसल्याचे सांगून सरकारला धारेवर धरले. रेल्वे विभागाकडून रेल्वे मार्गाचे बांधकाम करत असताना शेतकऱ्यांच्या वहिवाटीतील रस्ते बंद करुन रेल्वे मार्गावरती युबी,ओबी अशा रस्त्यांची निर्मीती केली जाते परंतू हे रस्ते दर्जाहीन असल्याने शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागतो.

जिल्हयातील रेल्वे संबंधीच्या समस्यांवर बोलत असताना धाराशिव रेल्वे स्थानकावरील रॅक पॉइन्ट येथे निवारा शेड नसल्याने रेल्वेने आलेली खते,अन्नधान्याची पावसाळयात मोठया प्रमाणात नासाडी होते. रॅक पॉइन्ट येथे निवारा उभा करण्याकडेही खासदार ओमराजे यांनी रेल्वे मंत्री यांचे लक्ष वेधले.

# मुंबईतल्या शाळेत मध्यान्ह भोजनात आढळलं झुरळ

मुंबई : प्रतिनिधी मुंबईतल्या एका शाळेत विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात झुरळ आढळून आलं आहे. यावरुन विद्यार्थ्यांसाठीच्या जेवणाचा दर्जा राखला जात नसल्याचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाची प्रशासनानं गांभीर्यानं दखल घेणं गरजेचं आहे. कारण यामुळं विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ होत असल्याची भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.



घाटकोपरच्या केव्हीके शाळेत मध्यान्ह भोजनात हे झुरळ आढळून आलं आहे. दुपारच्या शिजवलेल्या खिचडीमध्ये हा किटक आढळून आला आहे. आठवीच्या विद्यार्थिनीला डब्यामध्ये ही खिचडी वाढण्यात आली तेव्हा त्यामध्ये झुरळ दिसून आलं, या विद्यार्थीच्या हे लक्षात आल्यानंतर तिनं शिक्षकांच्या लक्षात ही बाब आणून दिली. मध्यान्ह भोजन योजना ही भारत सरकारची योजना असून शालेय विद्यार्थ्यांना शाळेत पौष्टिक आहार दिला जातो. विद्यार्थ्यांचं आरोग्य सुदृढ राहावं आणि कुपोषणापासून रक्षण व्हावं हा या योजनेचा उद्देश आहे. तसंच तळागळातल्या गरीब विद्यार्थ्यांनीही शाळेत हजेरी लावावी यासाठी प्रोत्साहनपर हा उपक्रम आहे. या योजनेंतर्गत दुपारच्या वेळेत शाळेत विद्यार्थ्यांना खिचडी हा पोषण आहार दिला जातो. पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वर्षातील २०० दिवस दररोज ८ ग्रॅम प्रोटीन आणि ३०० कॅलरी ऊर्जेचा समावेश असेल असं जेवण दिलं जातं. सन २००१ मध्ये सुप्रीम कोर्टानं राज्य सरकार आणि केंद्र सरकारला ही योजना लागू करण्याचे आदेश दिले होते. तामिळनाडूनं ही योजना सर्वात आधी लागू केली होती.

# इंडिया आघाडीसोबत जाणार नितीश कुमार?

बक्सर : वृत्तसंस्था बिहारच्या राजकारणात नितीश कुमारांची खासियत थ्री सी म्हणजेच क्राइम, करप्शन आणि कम्युनलिज्म याबाबत झीरो टॉलरेंस अशी आहे. मात्र त्याचसोबत आघाडीच्या राजकारणात पलटी मारणं हे सुद्धा आहे. त्यामुळे वारंवार पलटी मारणाऱ्या बातम्यांमध्ये नितीश कुमार सातत्याने चर्चेत असतात. बिहारला पुन्हा एकदा विशेष राज्याचा दर्जा मिळाला नाही. त्यामुळे नितीश कुमार लवकरच इंडिया आघाडीसोबत येतील अशी चर्चा आहे. कॉंग्रेस आमदार संजय तिवारी उर्फ मुन्ना यांनी म्हटलं की, नाराज असलेले नितीश कुमार लवकरच एनडीएची साथ सोडून महाआघाडीसोबत येणार आहेत. त्यांच्या नाराजी मागचं कारण म्हणजे त्यांचे ड्रीम असलेले बिहार राज्याला विशेष राज्याचा दर्जा मिळवणं ते झालं नाही. केंद्र सरकारच्या थेट नकारामुळे नितीश कुमार इतके नाराज झाले की त्यामुळे ते नीती आयोगाच्या बैठकीलाही हजर राहिले नाहीत असं त्यांनी सांगितले.

अशाप्रकारे नाराजीच्या बातम्या चर्चेत येण्यास स्वत:नितीश कुमार कारण आहेत. त्यांच्यासोबत काम करणाऱ्या राजकीय सहकाऱ्यांनाही ते कुठल्या कारणाने नाराज होतील आणि खुश होतील हे माहिती होत नाही. परंतु त्यांची राजकीय नाराजी ही त्यांच्या निकटवर्तीयांच्या खांद्यावर बंदूक ठेवून होते. एनडीएत जायचे असेल तर त्यांच्या जवळचे संजय झा यांचं मत असल्याचं सांगतात आणि महाआघाडीत जायचं असेल तर ते विजयेंद्र यादव यांचं नाव घेतात. नितीश कुमार हे राजकारण स्वत:भोवती ठेवण्यासाठी आणि त्याचवेळी समोरच्या व्यक्तीला आपली राजकीय स्थिती दाखवण्यासाठी हे करतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे आणि त्यासाठी नितीश कुमार यांनी जे दोन शब्द सर्वाधिक वापरले ते म्हणजे जातीयवाद आणि जंगलराज. जंगलराज म्हणत एनडीएमध्ये आणि जातीयवादाचा आरोप करत महाआघाडीसोबत जात मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीच्या सुरक्षिततेने राजकीय पोकळी भरत आहेत.

विशेष म्हणजे त्यांच्या जवळच्यांनाही त्यांचा विवेक कधी जागृत होतो ते कळत नाही आणि मग एका झटक्यात नितीश कुमार आपला पत्ता बदलतात. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याबाबत सातत्याने पलटी मारण्याची भाषा होते. ते कुठल्याही गोष्टीवरून नाराज होतात. आता मुख्यमंत्रिपदाची खुर्चीच नाही तर पक्षही वाचवायचा आहे, त्यामुळे कधी इथे तर कधी तिथे असं त्यांचे राजकारण असते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE